20 MAR 2017 तरूण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वत:ला सिद्ध करून दाखवा : डॉ. नांदवडेकर

वार्ताहर
महागाव

देशात वेगवेगळ्या क्षेत्रातील कौशल्यावर आधारित ४० लाख नोकऱ्या उपलब्ध आहेत. परंतु त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांची कमतरता आहे. महाविद्यालयीन काळ हाच आपल्या जीवनाला कलाटणी देणारा असतो. आजचा विद्यार्थी सोशल मीडियाचा वापर हा वेळ घालविण्यासाठी अधिक करीत आहे. जर त्यांने अधिकाधिक वेळ संशोधन, कौशल्य विकास व अध्ययनासाठी करून स्वत:ला सिद्ध करून दाखविले तर तुम्हाला नोकरी शोधण्याची गरज नाही. नोकरीच तुम्हाला शोधेल, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी काढले. महागाव येथील संत गजानन महाराज इंजिनिअरींग महाविद्यालयाने आयोजित केलेल्या तिसऱ्या राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. आण्णासाहेब चव्हाण होते.

डॉ. नांदवडेकर पुढे म्हणाले, ज्या महाविद्यालयांना जास्तीत जास्त विद्यार्थी प्रवेश हवा असतो अशा महाविद्यालयांनी वर्षभरात वेगवेगळे उपक्रम, संशोधन, व्याख्याने, कार्यशाळा यांचे आयोजन केले पाहिजे. यातूनच कॉलेजची व संस्थेची ओळख सर्वदूर होते. स्वागत प्राचार्य डॉ. बिमलेशकुमार यांनी



**महागाव : संत गजानन इंजिनिअरींगमधील परिषदेत बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

केले. यावेळी प्रकल्प सादरीकरण, सामान्यज्ञान, प्रश्नमंजुषा, रोबोटेक्स, भित्तीपत्रिका, पेंटिंग स्पर्धा पार पडल्या. यात १३६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

**'संत गजानन' मध्ये राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद**


विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते चषक, प्रमाणपत्र व रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण, डॉ. अन्सार पटेल, महेश भट्ट, डॉ. एस. एच. सावंत, सुभाष कुलकर्णी, तुषार यमगेकर, मयुर त्रिभुवणे, माधवी घुगरे, प्रा. प्रशांत पालकर, सहशिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. चंद्रशेखर रूडगी यांनी तर आभार प्रा. एम. जी. मुल्ला यांनी मानले.

20 MAR 2017 सकाळ जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकी अभ्यासक्रम प्रभावीपणे राबवावा

## डॉ. जयदीप बागी : तंत्रज्ञान अधिविभागातर्फे 'एचआर मीट'

कोल्हापूर, ता. १९ : औद्योगिक जगत व शिक्षण क्षेत्र यांच्यातील तफावत दूर करण्यासाठी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी आज येथे व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे एचआर मीट २०१७ कार्यक्रमात बोलताना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित 'एचआर मीट-२०१७' कार्यक्रमात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. डॉ. बागी यांनी औद्योगिक जगताच्या विद्यार्थ्यांकडून असलेल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी काय करता येईल, याचे स्पष्टीकरण केले. विद्यार्थ्यांनी कमी वेळेत कौशल्य कसे आत्मसात करावे व स्वत:ची ओळख कशी पटवून द्यावी, याचाही ऊहापोह केला. अभियांत्रिकीमधील शिक्षण पूर्ण झाल्यावर आवश्यक असलेली नोकरी कशी मिळविता येईल, त्यासाठी विद्यार्थ्यांनी काय करावे, याची चर्चा करण्यात आली. ३५ कंपन्यांतील प्रतिनिधींनी सहभागी होते. सकाळच्या सत्रात पॅनेल डिस्कशन झाले. दुपारच्या सत्रात तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांशी कंपन्यांतील प्रतिनिधींनी संवाद साधला. या प्रसंगी सुधन्वा देशपांडे, राजू जांभेकर, सतेज राजपूर, अभिजित साळुंखे, सुरेश पाटणकर, विजय पाटील, युवराज पाटील, दिगंबर पाटील, डॉ. राजेंद्र पारिजात उपस्थित होते.

### सॅटर्डे क्लब...

महिन्याच्या दुसऱ्या किंवा चौथ्या शनिवारी विद्यार्थी, प्राध्यापक व उद्योजक यांच्यात संवाद साधला जाणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागात त्याचे आयोजन केले जाईल. यातून उद्योग जगताला आवश्यक गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ मिळण्यासाठी काय करावे लागेल, याची चर्चा होणार आहे. त्याचबरोबर या चर्चेचा कृती आराखडा तयार केला जाऊन त्याची अंमलबजावणी केली.

20 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकी अभ्यासात बदल करण्याची गरज

## डॉ. जयदीप बागी यांचे प्रतिपादन : पारंपरिक शिक्षणामुळे औद्योगिकरणात विद्यार्थी टिकू शकत नाही



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांबरोबर डॉ. जयदीप बागी, डॉ. पारिजात, डॉ. एस. बी. सादळे व सर्व कंपन्यांचे प्रतिनिधी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम वाढणाऱ्या औद्योगिकरणाच्या दृष्टीने असला पाहिजे. कारण पारंपरिक शिक्षणामुळे औद्योगीकरणात विद्यार्थी टिकू शकत नाही. म्हणून विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करणारा अभ्यासक्रम असला पाहिजे, असे प्रतिपादन डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने आयोजित शाहू सिनेट सभागृहातील 'एच. आर. मीट २०१७' मध्ये बोलत होते. औद्योगिक क्षेत्रातील कॉम्प्युटर, सिव्हील व कन्स्ट्रक्शन्स अशा सर्व क्षेत्रातील मानांकित कंपन्यांचे एच. आर. संचालक तसेच इंजिनिअर उपस्थित होते.

डॉ. बागी म्हणाले, औद्योगिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना करिअर करण्यासाठी कौशल्य विकास, तंत्रज्ञानातील सखोल ज्ञान, नवीन अभ्यासक्रम यासाठी आर्थिक तरतूद, तांत्रिक बदल आत्मसात केले पाहिजेत, याविषयी मार्गदर्शन केले. सध्या कौशल्य विकासासाठी लागणारी तांत्रिक माहिती, नवीन अभ्यासक्रमातील ज्ञान मिळवले पाहिजे. एखाद्या कंपनीच्या मुलाखतीला जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी पूर्वतयारी केली पाहिजे.

सायबर कॉलेजचे डॉ. पारीजात म्हणाले, विद्यार्थ्यांनी सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास केला पाहिजे. औद्योगिक व शिक्षण जगतातील दूरी कमी करण्यासाठी अभियांत्रिकी अभ्यासात बदल केले पाहिजेत. औद्योगिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून आलेल्या मागण्यांची पुर्तता करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

या 'एच. आर. मीट २०१७'मध्ये वोरॅकल, टेक महिंद्रा, सीमेन्स, विनाची ऑर्ग्यानिक, इमरसन, कोमाऊ इन्टरनॅशनल, देसाई अॅग्रोफ्रुटस, कॅटबरी इंडिया अशा ३५ कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलप्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मीट घेण्यात आली. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

2 0 MAR 2017 पुढारी जनसपर्क अधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बदल स्वीकारून तंत्रज्ञान अवगत करा

## एच.आर. कार्यशाळेत मान्यवरांचा सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जग वेगाने बदलत राहील. स्पर्धा आणि आव्हाने असंतीलच. परंतु, विद्यार्थ्यांनी बदल स्वीकारत तंत्रज्ञानात अपडेट राहणे हाच नव्या जगाचा मंत्र असल्याचा मौलिक सूर एच.आर. कार्यशाळेत मान्यवरांकडून शनिवारी व्यक्त झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने शाहू सिनेट हॉल येथे 'एच.आर. मिट २०१७' चर्चासत्र संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी मॅकेनिकल, कॉम्प्युटर, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स आदी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचे एच.आर. उपस्थित होते. अभियांत्रिकी विद्यार्थी आणि उद्योग जगत यासंदर्भातील मार्गदर्शन यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता. आणि यासोबत गरजेचे असणारे स्कील्स याची चर्चा सर्वच मान्यवरांनी केली. नोकऱ्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. परंतु, आम्हाला आवश्यक कुशल मनुष्यबळ मिळत नसल्याची खंतही यावेळी चर्चेतून व्यक्त करण्यात आली. कष्टाची तयारी, सतत शिकण्याची वृत्ती असेल, तर स्वत:चा उद्योगसुद्धा विद्यार्थ्यांना करता येऊ शकेल, असे यावेळी मान्यवरांकडून सुचवण्यात आले.

वाढणाऱ्या ताणतणावाचे व्यवस्थापन करून आनंदी कसे जगावे, याबद्दलचे मार्गदर्शन डॉ. पारिजात यांनी केले. यावेळी मर्सिडीज बेंझ, महिंद्रा, टाटा कम्युनिकेशन, रिलायन्स आदी कंपन्यांतील प्रतिनिधींसह इतर अनेक कंपन्यांचे एच.आर. मार्गदर्शनासाठी उपस्थित होते. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, प्राध्यापकांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 0 MAR 2017

पुण्यनगरी

# शकुंतला पाटील यांच्याकडून महावीर अध्यासनास निधी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनास इस्लामपूर येथील शकुंतला तात्यासाहेब पाटील यांनी ३१ हजार रुपयांचा निधी प्रदान केला. विद्यापीठाच्या वतीने विशेष कार्य अधिकारी डॉ. डी. टी. शिर्के यांनी या धनादेशाचा स्वीकार केला.

शकुंतला पाटील या ज्येष्ठ विचारवंत डॉ. जे. एफ. पाटील यांच्या भगिनी आहेत. जैन धर्माचा शास्त्रशुद्ध अभ्यास, त्याच्या नीतितत्त्वांचा अभ्यास व संशोधन भगवान महावीर अध्यासनाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात सुरू आहे. या कार्याला बळ मिळावे, म्हणून हा निधी देण्यामागे आपली भावना असल्याचे पाटील यांनी सांगितले.

डॉ. जे. एफ. पाटील यांच्यासह विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. विलास सोयम, सहायक कुलसचिव विलास सावंत, सुदर्शन तात्यासाहेब पाटील, सुजाता सुदर्शन पाटील आणि विद्या अमर कनवाडे उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ आणि आयसीए एज्यु. स्कील्सतर्फे 'जीएसटी'वर कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ आणि आयसीए एज्यु. स्कील्स कंपनीच्या वतीने गुडस् अँड सर्व्हिस टॅक्स (जीएसटी) या विषयावर अध्यापक विकास कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. के. कल्हार होते. यावेळी आयसीए एज्यु. स्कील्सचे आजाजुसैन बोहरी म्हणाले, या कार्यशाळेचा लाभ सहभागी असणाऱ्या अध्यापकांना निश्चितपणे होणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभावांविषयी अनेक गोष्टी यातून समजणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, अध्यापक विकास कार्यशाळेमुळे शैक्षणिक, तसेच सामाजिक दृष्टीने व्यापक ज्ञानाची देवाणघेवाण झाली. चार्टर्ड अकौंटंट गगन केडिया यांनी 'जीएसटी' विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांनी अध्यापकांच्या निर्मितीसाठी आवश्यक कौशल्याची सविस्तर मांडणी केली. कार्यशाळेत सहभागी सर्व प्राध्यापकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2017
लोकमत

# 'जीएसटी'वर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि आयसीए एज्यू स्किल्स यांच्यातर्फे *'गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स'* (जी.एस.टी.) या विषयावर अध्यापक विकास कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी अध्यक्ष बी. के. कल्हार होते. अध्यापन सदस्यांना अर्थव्यवस्थेत होणाऱ्या दूरगामी बदलांबाबत तसेच शिक्षण व करिअरवरील त्यांच्या प्रभावाबाबत या कार्यशाळेत माहिती देण्यात आली.

तज्ज्ञ चार्टर्ड अकौंटंट गगन केडिया यांनी 'जीएसटी' विषयावर मार्गदर्शन केले. एज्यू स्किल्स प्रा. लि.चे आरसीए अजाजूसैन के. बोहरी म्हणाले, या कार्यशाळेमुळे अध्यापक जी.एस.टी.चे महत्त्व समजू शकतील आणि भारतीय अर्थव्यवस्थेवरील त्याच्या प्रभावांविषयी जाणून घेऊ शकतील, असे सांगून त्यांनी 'आरसीए'बद्दल माहिती दिली. विद्यापीठाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2017
महाराष्ट्र टाईम्स

## तत्वनिष्ठ प्राध्यापक



शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. द. ना. धनागरे यांचे नुकतेच निधन झाले. १९९५ ते २००० शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून त्यांची कारकीर्द विद्यापीठातील अंतर्गत समस्या, घोषणा, मागण्या, आंदोलने, निवेदने यावर त्यांनी यशस्वीपणे मात करून आपला पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला. ते कोणत्याही दबावाला झुकले नाहीत. ही गोष्ट शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी आहे.

- **मधुकर देशपांडे**, कोल्हापूर